५ हजार घर बांधण्याचा निर्णय घेतला; चंद्रशेखर बावनकुळे यांची माध्यमांशी माहिती >>पान 2

काम न करणाऱ्यांसाठी आता आम्ही निर्णय घेतले; उपमुख्यमंत्री अजित पवार यांची माध्यमांशी माहिती >>पान 3

जीवे मारण्याच्या धमक्या आम्हालाही येतात : आ. संजय गायकवाड >>पान 4

**सुविचार**
निसर्गाच्या सौंदर्याचा आनंद घ्या.



दैनिक

# आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 253 ■ शनिवार, दि. 26 एप्रिल 2025 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006

अक्षय कुमार पुन्हा एकदा फ्लॉप! ६ दिवसांत बजेटच्या निम्मीही कमाई करु शकला नाही केसरी २ आतील पान

# अमरावती विमानतळाच्या धावपट्टीच्या विस्तारीकरणाचा आराखडा सादर करा – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## शिर्डी विमानतळावर दोन हेलिपॅड व आठ वाहनतळ उभारण्यास मान्यता

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी : आगामी नाशिक–त्र्यंबकेश्वर कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर शिर्डी विमानतळ येथे दोन हेलिपॅड व ८ वाहनतळ उभारण्यास व विमानतळाचे विस्तारीकरण, अद्ययावतीकरणास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महाराष्ट्र विमानतळ प्राधिकरणाच्या बैठकीत मान्यता दिली. अमरावती विमानतळाच्या धावपट्टीच्या विस्तारीकरणाचा आराखडा सादर करण्याचे निर्देशही मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी यावेळी दिले.**





महाराष्ट्र विमानतळ प्राधिकरणाच्या संचालक मंडळाची ९१ वी बैठक सह्याद्री अतिथीगृहातील सभागृहात झाली. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे उपस्थित होते. प्राधिकरणाच्या उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक स्वाती पांडे यांनी सादरीकरणाद्वारे माहिती दिली.

अमरावती येथे उद्योगाचे जाळे मोठ्या प्रमाणात विस्तारत असल्याने या ठिकाणची धावपट्टी वाढविणे आवश्यक आहे. या विमानतळापासून महसूल मिळविण्यासाठीचा आराखडा तयार करावा. असे मुख्यमंत्र्यांनी यावेळी नमूद केले. शिर्डी येथील विमानतळाच्या कार्गो टर्मिनलचे काम वेगाने सुरू आहे. नाशिकपासून शिर्डी विमानतळ जवळ असल्याने नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळ्याच्या वेळेस हवाई मार्गाने येणाऱ्या भाविकांना शिर्डी विमानतळ सोईचे होणार आहे. त्यावेळी होणाऱ्या संभाव्य गर्दीचा विचार करून व नाशिक येथील विमानतळाची क्षमता लक्षात घेता शिर्डी विमानतळाच्या विस्तारीकरणाच्या प्रस्तावास यावेळी मान्यता देण्यात आली. यामध्ये ८ वाहनतळे, दोन हेलिपॅड यासह टर्मिनलच्या अद्यावतीकरणाचा समावेश आहे. याचा फायदा कुंभमेळ्यादरम्यान येणाऱ्या विमाने व हेलिकॉप्टर सेवेसाठी होणार आहे.

लातूर जिल्ह्याचा सर्व क्षेत्रात मोठ्या प्रमाणात विकास व विस्तार होत आहे. त्यामुळे लातूर विमानतळ महत्त्वाचे ठरणार आहे. त्यासाठी या विमानतळाचा विकास करण्यात यावा. या विमानतळाचा लातूरसह बीड, धाराशिव या जिल्ह्यांनाही लाभ होईल. तसेच कराड येथील विमानतळाचे काम वेगाने सुरू करून तेथे नाईट लँडिगची सुविधा निर्माण करण्याचे निर्देशही मुख्यमंत्री श्री.फडणवीस यांनी यावेळी दिले.

चंद्रपूर येथील विमानतळावर चार्टर्ड विमाने उतरू शकतील अशी सुविधा तयार करण्यासाठी तेथील धावपट्टी वाढविण्यात यावी. गडचिरोली येथील विमानतळासाठी दोन ते तीन पर्यायी जागांचा विचार करण्याच्या सूचनाही त्यांनी यावेळी दिल्या.

यावेळी रत्नागिरी, अकोला, कोल्हापूर, नांदेड, धुळे येथील विमानतळाच्या कामाचाही आढावा घेण्यात आला. प्रादेशिक जोडणी योजना (रिजनल कनेक्टिव्हीटी स्किम) अंतर्गत सध्या राज्यात १६ मार्गांवर विमानसेवा सुरू असून उड्डाण योजनेअंतर्गत राज्यातील आठ प्रस्ताव केंद्राकडे पाठविण्यात आले असल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

प्राधिकरणाच्या उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक स्वाती पांडे, संचालक मंडळतील सदस्य तथा वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव ओ पी गुप्ता, परिवहन विभागाचे अपर मुख्य सचिव संजय सेठी, 'एमआयडीसी'चे मुख्य कार्यकारी अधिकारी पी वेलरासू यांच्यासह विविध अधिकारी उपस्थित होते.

## पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर बंगळुरुत हाय अलर्ट

**बंगळुरु :** जम्मू काश्मीरच्या अनंतनाग जिल्ह्यातील पहलगाम येथे पर्यटकांवर दहशतवाद्यांनी भ्याड हल्ला केला होता. या हल्ल्यात २६ जणांचा मृत्यू झाला तर १७ जण जखमी झाले आहेत. पुलवामा येथील २०१९ नंतरचा सर्वात मोठा दहशतवादी हल्ला पहलगाममध्ये झाला. या पार्श्वभूमीवर कर्नाटकनं अंतर्गत सुरक्षा वाढवली असून पाकिस्तानातून आलेले बेकायदेशीर नागरिक आणि स्लीपर सेलचा संभाव्य धोका या पार्श्वभूमीवर निर्णय घेण्यात आला आहे.

**स्लीपर सेलचा संभाव्य धोका टाळण्यासाठी मोठं पाऊल**

केंद्र सरकारनं पाकिस्तानी नागरिकांना भारतात प्रवेश करण्यास मनाई केली आहे. पाकिस्तानी नागरिकांना दिलेला सार्क व्हिसा रद्द करण्यात आला आहे. कर्नाटकचे गृहमंत्री जी. परमेश्वरस यांनी जे बेकायदेशीरपणे किंवा कोणत्याही वैध कागदपत्रांशिवाय राज्यात असतील त्यांना शोधून देशाबाहेर पाठवलं जाईल असं म्हटलं.

केंद्र सरकारनं पाकिस्तानच्या पासपोर्ट धारकांना दिलेला सार्क व्हिसा रद्द करण्याचा निर्णय घेतला आहे. जी परमेश्वरा यांनी ज्यांच्याकडे योग्य कागदपत्रं नसतील त्यांची कसून चौकशी केली जाईल, असं म्हटलं. एएनआयशी बोलताना ते म्हणाले की केंद्रीय गुप्तचर यंत्रणांसोबत समन्वयानं काम करत आहोत. कर्नाटकात विशेषत: बंगळुरुत एखादा पाकिस्तानी नागरिक सापडल्यास त्याला ताब्यात घेऊन पाकच्या उच्चायुक्ताकडे सोपवण्यात येईल.

कर्नाटकच्या पोलिसांनी बेकायदेशीर किंवा अवैधपणे राज्यात राहणाऱ्या पडताळणीसाठी किंवा शोधण्यासाठी पथकं स्थापन करण्यात आली आहे. या पथकांकडून लॉज, गेस्ट हाऊस किंवा वस्त्यांमध्ये शोध घेतला जाईल. सीबीआय आणि आयबीच्या अधिकाऱ्यांना देखील स्थानिक पोलीस स्टेशनला भेटी देण्यासंदर्भात आदेश दिले गेले आहेत. संभाव्य स्लीपर सेलच्या हालचाली किंवा कारवाया रोखण्यासाठी सीबीआय आणि आयबीची मदत घेण्याचा कर्नाटक सरकारचा प्रयत्न आहे.

## मेंढपाळांच्या अनुदानाची रक्कम थेट बँक खात्यात जमा

**मुंबई/प्रतिनिधी :** पुण्यश्लोक अहिल्यादेवी महाराष्ट्र मेंढी व शेळी विकास महामंडळाच्या वतीने राज्यातील भटक्या जमाती प्रवर्गातील धनगर व तत्सम समाजातील मेंढपाळांना अनुदानाची रक्कम देण्यात आली आहे. ३०५४ मेंढपाळांना सन २०२४-२५ या वर्षासाठी चराई अनुदानापोटी ७.३३ कोटी रुपयांचे अनुदानाचे थेट हस्तांतरण (डीबीटी) द्वारे बँक खात्यात जमा केले आहे. मेंढ्यांच्या चराईकरिता राज्यातील मेंढपाळांना अर्थ सहाय्य उपलब्ध झाल्यामुळं मेंढपाळांना शाश्र्वत उत्पन्नाचा स्रोत्र निर्माण झाला आहे. त्यांच्या आर्थिक प्रगतीस हातभार लागला असल्याची भावना पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांनी व्यक्त केली आहे. महाराष्ट्र राज्यामध्ये मेंढीपालन व्यवसाय हा पूर्णपणे स्थलांतरित पद्धतीने केला जातो.

## मुंबईच्या वेव्हज् परिषदेत नवकल्पनेसोबत तंत्रज्ञानाचा महासागर

**मुंबई/प्रतिनिधी :** केंद्र सरकारच्यावतीने जागतिक ऑडिओ–व्हिज्युअल आणि मनोरंजन क्षेत्राकरिता 'वेव्हज् २०२५ परिषद' मुंबईतील बीकेसी येथील जिओ वर्ल्ड सेंटर येथे होत आहे. या परिषदेचे यजमानपद महाराष्ट्र शासन भूषवत आहेत. दि. १ ते ४ मे २०२५ या कालावधीत होत असलेल्या या परिषदेचे उद्घाटन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, उद्योग मंत्री उदय सामंत यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे. मुंबईत होणाऱ्या या परिषदेस विविध देशांचे मंत्री, धोरणकर्ते, उद्योगपती तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी उपस्थित राहणार आहेत.

वेव्हज् परिषदेत जगभरातून १०० पेक्षा जास्त देश सहभागी होणार आहे. या परिषदेच्या माध्यमातून भारतातील क्रिएटिव्ह इकॉनॉमीला मोठ्या प्रमाणात चालना मिळण्यास मदत होणार आहे. भारतामध्ये माध्यम आणि मनोरंजन उद्योग वेगाने वाढत असून रोजगारनिर्मितीसाठी या क्षेत्रात मोठ्या प्रमाणात संधी उपलब्ध होत आहे. त्याचबरोबर ओटीटी, ॲनिमेशन, गेमिंग, व्हीएफएक्स, चित्रपट, संगीत आणि डिजिटल मीडिया क्षेत्रात देश प्रगती करत आहे. या पार्श्वभूमीवर वेव्हज् परिषदेचे आयोजन होत असून या परिषदेत चर्चासत्रे, उद्योगक्षेत्रात गुंतवणूक आणि विविध कार्यक्रम होणार आहे.


या परिषदेच्या पहिल्या दिवशी 'भारत व महाराष्ट्र पॅव्हिलियन' आणि वेव्हज प्रदर्शनाचे उद्घाटन होणार असून काही महत्त्वपूर्ण घोषणा व सामंजस्य करार करण्यात येणार आहे. त्याचबरोबर क्रिएटोस्पिअरचे उद्घाटन आणि 'वेव्हज बझार', वेव्हज एक्सलेटर इत्यादींचा प्रारंभ होणार आहे. परिषदेच्या दुसऱ्या दिवशी जागतिक मीडिया संवाद, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांमध्ये संवाद तसेच क्रिएट इन इंडिया चॅलेन्जेसची अंतिम फेरी होणार आहे. या परिषदेच्या तिसऱ्या आणि चौथ्या दिवशी विविध चर्चासत्रांबरोबरच प्रदर्शनाचे आयोजन करण्यात येणार आहे.

## सावरकरांवर टिप्पणी : सुप्रीम कोर्टाने राहुल गांधींना फटकारले

### स्वातंत्र्यसैनिकांवरील बेजबाबदार विधाने योग्य नाहीत; ट्रायल कोर्टाचे समन्स स्थगित

**नवी दिल्ली :** स्वातंत्र्यवीर सावरकर अवमान प्रकरणात लोकसभा विरोधी पक्षनेते तथा राहुल गांधी यांच्याविरुद्ध लखनौ न्यायालयाने जारी केलेल्या समन्सला सर्वोच्च न्यायालयाने स्थगिती दिली. सर्वोच्च न्यायालयाने राहुल गांधींना बेजबाबदार विधाने करू नका असा इशाराही दिला. जर भविष्यात त्यांनी पुन्हा असे विधान केले तर न्यायालय त्या विधानाची दखल घेईल, असे सर्वोच्च न्यायालयाने म्हटले आहे.

न्यायालयाने म्हटले की, 'तुम्ही महाराष्ट्रात असे विधान केले. तिथे लोक त्यांची पूजा करतात. तुमच्या आजीनेही सावरकरांचे कौतुक करणारे पत्र लिहिले होते. महात्मा गांधी जेव्हा ब्रिटीश अधिकाऱ्यांना पत्रे पाठवत असत तेव्हा ते लिहित असत, तुमचा विश्र्वासू सेवक. तर त्यामुळे तुम्ही महात्मा गांधींना इंग्रजांचे सेवक म्हणणार का? स्वातंत्र्यसैनिकांचा अपमान करणे चुकीचे आहे. सुमारे अडीच वर्षांपूर्वी राहुल गांधी यांनी अकोल्यात सावरकरांबद्दल एक



विधान केले होते. त्यावेळी ते काँग्रेसच्या भारत जोडो यात्रेत होते आणि ही यात्रा महाराष्ट्रातून जात होती. १७ डिसेंबर २०२२ रोजी ते महाराष्ट्रातील अकोला जिल्ह्यात होते. येथे त्यांनी सावरकरांचा उल्लेख 'ब्रिटिशांचा सेवक' असा केला होता ज्यांना ब्रिटिश सरकारकडून पेन्शन मिळत असे.

राहुल गांधींच्या वकिलाने सर्वोच्च न्यायालयात सांगितले की, त्यांच्या अशिलाचा कोणालाही चिथावणी देण्याचा हेतू नव्हता. यावर न्यायालयाने म्हटले की, जर त्यांना कोणालाही चिथावणी द्यायची नव्हती तर त्यांनी अशी विधाने का केली. स्वातंत्र्यसैनिकांबद्दल खोटी विधाने करण्याचा अधिकार कोणालाही नाही, असा सक्त सल्ला न्यायालयाने राहुल गांधींना दिला आहे. त्यांनी राहुल गांधींना सांगितले की ते राजकारणी आहेत, मग ते अशी विधाने का करतात, असे करू नका.

लखनौ न्यायालयाने जारी केलेल्या समन्सला स्थगिती देताना सर्वोच्च न्यायालयाने म्हटले आहे की, 'आम्ही हे स्पष्ट करत आहोत की जर अशी विधाने पुन्हा केली गेली तर आम्ही स्वतःहून दखल घेऊ.' स्वातंत्र्यसैनिकांवर भाष्य करण्याचा अधिकार कोणालाही नाही. वकील नृपेंद्र पांडे यांनी तक्रार दाखल केली होती आणि आरोप केला होता की राहुल गांधी यांनी भारत जोडो यात्रेदरम्यान वीर सावरकरांचा जाणूनबुजून अपमान करण्याच्या उद्देशाने हे विधान केले होते. ते म्हणाले की, राहुल गांधी यांचे हे विधान वीर सावरकरांचा अपमान करण्याच्या सुनियोजित कटाचा भाग आहे.

## पाकिस्तानमध्ये १ कोटी लोक उपासमारीच्या उंबरठ्यावर, अहवालातून धक्कादायक माहिती समोर

**नवी दिल्ली :** जम्मू–काश्मीरच्या पहलगाममध्ये दहशतवादी हल्ल्यात २६ जणांचा मृत्यू झाला आहे, तर अनेकजण जखमी झाले आहेत. या हल्ल्यामागे पाकिस्तानचा हात असल्याचे बोलले जात आहे. हल्ल्यानंतर भारतानं पाकिस्तानविरोधात कडक पावले उचलायला सुरुवात केली आहे. अशातच आता पाकिस्तानातून आणखी एक वाईट बातमी समोर येत आहे. एकीकडे आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने पाकिस्तानचा विकास दर कमी राहण्याची शक्यता वर्तवली असतानाच दुसरीकडे जागतिक बँकेने पाकिस्तानला मोठा इशारा दिला आहे. चालू आर्थिक वर्षात सुमारे १ कोटी लोकांना उपासमारीचा सामना करावा लागेल, असा इशारा जागतिक बँकेने दिला आहे. यासोबतच गरिबीची पातळीही झपाट्याने वाढणार असल्याची माहिती अहवालात दिली आहे.



पाकिस्तानातील वाढत्या गरिबीचा इशारा देण्यापूर्वी जागतिक बँकेने आपल्या अहवालात तेथील आर्थिक विकास दर २.७ टक्के राहील असा अंदाज व्यक्त केला होता. जागतिक बँकेने यासाठी पाकिस्तानातील कठोर आर्थिक धोरणांना जबाबदार धरले आहे.

जागतिक बँकेने आपल्या अहवालात म्हटले आहे की, शाहबाज शरीफ यांचे सरकार वार्षिक वित्तीय तुटीचे लक्ष्य पूर्ण करण्यात अयशस्वी ठरले आहे आणि यामुळे जीडीपीच्या तुलनेत पाकिस्तानवरील कर्जाचा बोजा आणखी वाढण्याची अपेक्षा आहे. अहवालानुसार, जागतिक बँकेने म्हटले आहे की हवामानामुळे पाकिस्तानच्या संपूर्ण कृषी उत्पादनावर परिणाम होईल आणि तांदूळ, बाजरी यासारख्या प्रमुख पिकांवर वाईट परिणाम होईल. यामुळं पाकिस्तानमधील सुमारे १० दशलक्ष लोक (बहुतेक ग्रामीण भागात) उपासमारीच्या उंबरठ्यावर पोहोचतील.

अन्नटंचाई, गरिबी, बेरोजगारीमध्ये वाढ होणार असल्याची माहिती अहवालात देण्यात आली आहे. कृषी, उत्पादन आणि इतर कमी वेतनाच्या सेवांसारख्या प्रमुख क्षेत्रांवर नकारात्मक परिणाम होईल, ज्यामुळे दैनंदिन वेतन देखील वाढू शकणार नाही अशी माहिती अहवालात देण्यात आली आहे.

## मराठी मुलांची कामगिरी प्रेरणादायी

केंद्रीय लोकसेवा आयोगाने ( युपीएससी ) नागरी सेवा परीक्षा – २०२४ चा अंतिम निकाल जाहीर केला. केंद्रीय लोकसेवा आयोगाची ही परीक्षा अतिशय प्रतिष्ठेची समजली जाते. दरवर्षी विविध पदांकरिता आयोगाकडून परीक्षा घेतली जाते. दरवर्षी लाखो विद्यार्थी ही परीक्षा देतात. युपीएससीने २०२४ च्या परीक्षेसाठी आयएएस, आयपीएससह ११३२ पदांसाठी भरती जाहीर केली होती. यामध्ये १००९ विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली आहे. यात ७२५ पुरुष आणि २८४ महिलांचा समावेश आहे. म्हणजेच ही परीक्षा उत्तीर्ण होणाऱ्यात महिलांची संख्याही लक्षणीय आहे. महिलांचे हे यश नक्कीच सुखावणारे आहे. या यशस्वी विद्यार्थ्यांत महाराष्ट्रातील ९० हून अधिक विद्यार्थ्यांत समावेश आहे. पहिल्या शंभर यशस्वी विद्यार्थ्यांत ७ मराठी विद्यार्थी आहेत. महाराष्ट्रासाठी ही अभिमानाची बाब आहे. पूर्वी या परीक्षेत यशस्वी होणाऱ्या उमेदवारांत मराठी विद्यार्थ्यांची संख्या नगण्य होती पण मागील काही वर्षांपासून या परीक्षेतही मराठी मुलांनी बाजी मारून मराठी मुलेही कशात कमी नाही हे दाखवून दिले आहे. केंद्रीय लोकसेवा आयोगाची ही परीक्षा अतिशय कठीण असते. नागरी सेवेमधील ही सर्वोच्च परीक्षा असून या परीक्षेत यशस्वी झालेले विद्यार्थी पुढे जाऊन प्रशासकीय अधिकारी होतात. ही परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी विद्यार्थी खूप मेहनत घेतात रात्रीचा दिवस करतात. १२ ते १८ तास विद्यार्थी अभ्यास करतात त्यातून त्यांना हे यश मिळते. या परीक्षेत यश मिळवून अधिकारी होण्याचे स्वप्न प्रत्येक विद्यार्थी पाहतो आणि जेंव्हा हे स्वप्न साकार होते तेंव्हा त्याचा आनंद फक्त त्या विद्यार्थ्याला नसतो तर त्याच्या कुटुंबीयांना, नातेवाईकांना, मित्र मंडळींना आणि समाजालाही असतो. असाच आनंद बिरदेव डोणे या गरीब मेंढपाळ असलेल्या विद्यार्थ्याला मिळालेल्या यशानंतर संपूर्ण महाराष्ट्राला झाला आहे. बिरदेव डोणेने जे यश या परीक्षेत मिळवले आहे ते प्रेरणादायी आहे. कोल्हापूर जिल्ह्यातील कागल येथील मेंढपाळ कुटुंबात जन्मलेल्या बिरदेवचे प्राथमिक व माध्यमिक शिक्षण गावातीलच मराठी शाळेत झाले. दहावी बारावीत चांगले गुण मिळाल्यानंतर त्याने अधिकारी होण्याचे स्वप्न पाहिले आणि हे स्वप्न साकार करण्यासाठी त्याने रात्रीचा दिवस केला. पहिल्या दोन प्रयत्नात त्याला यश मिळाले नाही मात्र तिसऱ्या प्रयत्नात मात्र तो यशस्वी झाला आणि देशात ५५१ वी रँक मिळवली. केवळ बिरदेवचीच नव्हे तर या परीक्षेत यशस्वी झालेल्या सर्वच मराठी मुलांची कहाणी प्रेरणादायी आहे. जिद्द आणि ईच्छाशक्तीला मेहनतीची जोड मिळाली तर या जगात काहीही अशक्य नाही हेच या मुलांनी दाखवून दिले आहे. महाराष्ट्रातील या मुलांचे यश पाहून भविष्यात महाराष्ट्रातून आणखी सनदी अधिकारी निर्माण होतील यात शंका नाही. या परीक्षेत यशस्वी झालेले बहुतेक विद्यार्थी मराठी माध्यमातून शिकलेले आहेत हे विशेष. लाखो रुपये डोनेशन भरून इंग्रजी माध्यमात आपल्या मुलांना दाखल करणाऱ्या आणि इंग्रजी माध्यमातून शिकले तरच करियर होते असा समज असणाऱ्यांसाठी तर ही मोठी चपराक आहे. या परीक्षेत यशस्वी झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचे मनापासून अभिनंदन! सनदी सेवेमध्ये मराठी मुलांचे हे यश पाहून मराठी पाऊल पडते पुढे! असेच म्हणावे लागेल.

# ५ हजार घर बांधण्याचा निर्णय घेतला

## चंद्रशेखर बावनकुळे यांची माध्यमांशी माहिती

**दैनिक आपला विदर्भ**

नागपूर : प्रधानमंत्री आवास योजनेच्या माध्यामांतून स्वस्तात घर मिळणार आहेत. तसेच कामठी शहरामध्ये अडीच हजार घर बांधण्याचा निर्णय मी करतोय, भिलगाव ,खैरी जवळ ५ हजार घर बांधण्याचा निर्णय घेतला आहे. त्याच ८० टक्के काम पूर्ण झाले आहे. नागपूर शहर आणि जिल्ह्यातील साडेपाच हजार लोकांना तयार झालेले घर वाटणारा आहे. मुख्यमंत्र्यांच्या माध्यमातून मुख्यमंत्री घराचे वाटप करणार आहे. अशी माहिती महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी माध्यमांशी बोलताना दिली.

यावेळी बोलताना ते म्हणाले की, लवकरच नागपूर शहरांमध्ये हिस्लाप कॉलेजच्या जवळ जी म्हाडाची इमारत आहे. तिच रिव्हलपमेंट करण्याचा निर्णय आम्ही घेतला आहे आणि जेवढे शहरात अतिक्रमण आहे. तेवढे काढून त्यांना सुद्धा घर मिळाले पाहिजे, याची योजना तयार केली आहे. झोपडपट्टीत जे लोक राहतात. त्याची यादी तयार करण्याचे काम आमच्या महानगरपालिकेच्या आयुक्तांनी सुरु केले आहे. झोपडपट्टीमध्ये राहणाया लोकांना पंतप्रधान आवास योजने अंतर्गत घर देण्याचा निर्णय आम्ही घेतला आहे. मुख्यमंत्री यांनी वीस लक्ष मंजूर केले आहेत. परत घरकू ल योजनामध्ये दहा लक्ष घरे मुख्यमंत्री, केंद्र सरकारकडून मंजूर करून आणणार आहेत. त्यामुळे ३० लाख घर हा रेकॉर्ड आहे. राज्यात तीस लक्ष घर पुढच्या दोन वर्षात निर्माण होणार आहेत.मुख्यमंत्र्यांनी, मोदींनी आणि शिवराज सिंग चव्हाण यांच्याकडून हे मोठे पॅकेज महाराष्ट्राकडे आणले आहे.

नागपूर जिल्ह्यातील शेतमजुराचा झोपडपट्टी राहणाया लोकांचा घरे मिळणार आहेत.सर्वांसाठी घरे या योजनेमध्ये आम्ही घरांचा वाटप करतो आहे.कुणाचाही मनामध्ये मनमुठाव नाही. सरकारमध्ये कोणताही विसंवाद नाही. एकनाथ शिंदे यांनी श्रीनगरला जाऊन त्या ठिकाणी पर्यटकांची भेट घेणे हे काही राजकारण नाही. गिरीश महाजन यांना पाठवले यात काहीही राजकारण नाही. ते आपत्ती व्यवस्थापन मंत्री आहेत. म्हणून त्यांना तिथे पाठवलेले आहे आणि एकनाथ शिंदे एका पक्षाचे नेते म्हणून एकनाथ शिंदे तिथे गेले. जास्त व्हीव्हीआयपी मुमेंट वाढवून नाही म्हणून जास्त लोकांना पाठवले नाहीत. जर ही मोमेंट वाढली असेल तर, व्हीव्हीआयपीची जास्त सिक्युरिटी करावी लागली असती, त्यामुळे शिंदे आणि गिरीश महाजन गेले आणि आम्ही सगळ्या पर्यटकांना सुखरूप आणले.

महाराष्ट्रातील ३ ते ४ हजार पर्यटक येथे आहेत. त्या ठिकाणी त्यांना सुखरूप घरी आणण्याचे आमची योजना आहे. यामध्ये काही राजकारण नाहीये काही श्रेयवाद नाही आहे. ही काही घटना श्रेयवादाची नाही. देशाच फार मोठा नुकसान झालेला आहे. हे नुकसान फार मोठ आहे. यामध्ये जो काही राजकारण करत असेल त्यांचे राजकारण त्यांना लखलाभ आहे. अशा घटनेमध्ये संपूर्ण देश सरकारच्या पाठिशी उभा राहिला पाहिजे आणि मोदींनी सर्व पक्षांना आवाहन केलेले आहे. हे राजकारण करण्याचे दिवस नाही. देशाला मजबूत करण्याचे दिवस आहेत. या घटनेवर राजकारण करू नये, कुठेही आमचा विसंवाद नाही, एकनाथ शिंदे, देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार आम्ही एक ठिकाणी काम करतो आहे.



सरकार म्हणून आणि सरकारचे पहिली जबाबदारी आहे. की, पाणी टंचाईवर काम करणे, परवा तर, कॅबिनेटमध्ये मुख्यमंत्री यांनी यंत्रणे सुचना दिल्या आहेत. कॅबिनेटचा पहिला विषय हा पाणीटंचाईचा घ्यावा, महाराष्ट्राच्या पाणीटंचाईवरती चर्चा होणार आहे. कॅबिनेट सुरू झाल्यावर पहिला विषय हाच असणार आहे. या राज्यामध्ये पहिला विषय असणार आहे. पाणीटंचाई आणि गुरांच्या छावण्या, लोकांना पाणी त्यामुळे आमचे सरकार एकमताने पुढे जाण्यासाठी काम करत आहे.

राहुल गांधी पहलगामला चालले चांगलच आहे. सर्व पक्षाने एकत्र येऊन यातून पुढे जायच आहे. देश मजबूत करायचा आहे. पाकिस्तानी नागरिकांना परत पाठवण्याचा निर्णय योग्य आहे. राज्य सरकार केंद्र सरकारच्या भूमिकेशी सहमत आहे.आमच्या केंद्र सरकारने मोदींनी जो निर्णय घेतला आहे. देशाकरता महत्त्वाचा आहे. या देशाला अखंड ठेवण्याकरिता महत्त्वाचा आहे. केंद्र सरकारने घेतलेल्या निर्णयाचा तंतोतंत पालन राज्य सरकार करेल. नागपूर जिल्ह्यामध्ये पाण्याचा साठा मुबलक आहे. फक्त काटोल नरखेड भागामध्ये आठशे फूट खाली पाणी गेले आहे. मी कलेक्टर यांच्याकडे त्याच विषयावर चर्चा करायला आलो आहे. नागपूर शहर आणि जिल्हा, अमरावती शहर, जिल्हा पाणीटंचाईवर काम करण्याची जबाबदारी पालकमंत्री म्हणून माझी आहे. असे मत यावेळी महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी व्यक्त केले.

## ६१ तोळे ८ ग्रॅम सोनं आणि ४ किलो ७८७ ग्रॅम चांदीच्या दागिन्यांसह घरफोडी करणाऱ्या चोरट्यांना कोल्हापूर पोलिसांनी केल जेरबंद

**कोल्हापूर /प्रतिनिधी :** तब्बल ६१ तोळे ८ ग्रॅम सोनं आणि ४ किलो ७८७ ग्रॅम चांदीच्या दागिन्यांसह घरफोडी करणाऱ्या तिघा चोरट्यांना कोल्हापूर पोलिसांनी जेरबंद केल आहे. कोल्हापूर पोलिसांच्या स्थानिक गुन्हे शाखेने घरफोडी करणाऱ्या या टोळीला जेरबंद करत मोठी कामगिरी केली आहे. या कारवाईत इचलकरंजीतील एक मोटरसायकल चोरीचा गुन्हा आणि कोल्हापूर जिल्ह्यातील तब्बल ३३ घरफोडीचे गुन्हे उघडकीस आणले आहेत. याप्रकरणी पोलिसांनी सलीम महमद शेख, जावेद महमद शेख आणि लोकिक शेख या ३ आरोपींना अटक करण्यात आली आहे. २०२२ पासून अलीकडील काळात कोल्हापूर पोलिसांची ही सर्वात मोठी यशस्वी कारवाई असल्याचं सांगत आहे. या कामगिरीबद्दल कोल्हापूर परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक सुनील फुलारी यांनी संपूर्ण टीमचे कौतुक केले.

## बालाजी बंगला देवानगर जिर्णोद्धार कार्यक्रम संपन्न



**दैनिक आपला विदर्भ**

**■ देवानंद सानप**

**बिबी :** प. पू. आनंद चैतन्य महाराज व प. पू. कृष्णा महाराज यांच्या पावन हस्ते देवानगर ता. लोणार येथे बालाजी भगवान मुर्ती स्थापन, कलश रोहण सोहळा पार पडला.


या प्रसंगी आनंद चैतन्य महाराज यांच्या मधुर वाणीने भाविक भक्त मंत्रमुग्ध झाले... कार्यक्रमासाठी स्थानिक आमदार मनोज कायंदे तर कृष्ण महाराज बाबूजी महाराज यांची उपस्थिती होती. तसेच कळस रोहणासाठी आलेल्या लेकींना निलेश भाऊ राठोड यांच्या कल्पनेतून प्रसाद, तांब्या, साडीपिस भेटवस्तू चे महाराजांच्या हस्ते वाटप करण्यात आले.

## अक्षय कुमार पुन्हा एकदा फ्लॉप! ६ दिवसांत बजेटच्या निम्मीही कमाई करू शकला नाही केसरी २

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी :** केसरी २ या चित्रपटाची क्रेझ बॉक्स ऑफिसवर कमी होताना दिसत आहे. १८ एप्रिल रोजी चित्रपट प्रदर्शित होऊन ६ दिवस झाले आहेत आणि तो त्याच्या बजेटचा अर्धा भागही वसूल करू शकलेला नाही. अशा परिस्थितीत अक्षय कुमारच्या खात्यात आणखी एक फ्लॉप चित्रपट जमा होणार आहे, असंच दिसतंय.

केसरी २ बॉक्स ऑफिसवर दररोज सरासरी कलेक्शन करत होता. सनी देओलच्या जाट चित्रपटाशी टक्कर झाल्यानंतर, चित्रपटानं दररोज कोट्यवधींची कमाई केली. पण आता केसरी २ गटांगळ्या खाऊ लागला आहे. ७.७५ कोटींनी सुरुवात करणाऱ्या या चित्रपटाच्या कलेक्शनमध्ये बुधवारी (सहाव्या दिवशी) मोठी घट दिसून आली.



केसरी २ सहाव्या दिवसाचं कलेक्शन किती?

केसरी २ च्या सहाव्या दिवसाच्या कलेक्शनचे सुरुवातीचे आकडे समोर आले आहेत. सॅक्निल्कमधील एका वृत्तानुसार, अक्षय कुमारच्या चित्रपटानं आतापर्यंत (संध्याकाळी ७ वाजता) बॉक्स ऑफिसवर ३.२० कोटी रुपये कमावले आहेत. आता चित्रपटाचं एकूण कलेक्शन ४२.२० कोटी रुपये झालं आहे. जरी हे केसरी २ च्या बजेटच्या एक तृतीयांशही नाही. मीडिया रिपोर्ट्सनुसार, चित्रपटाचं बजेट १५० कोटी रुपये आहे.

केसरी २ फ्लॉप ठरेल

केसरी २ च्या दैनंदिन कलेक्शनवर नजर टाकल्यास, चित्रपटाला त्याची किंमत वसूल करता येणार नाही असा अंदाज आहे. हे असंही म्हटलं जातंय, कारण आता २५ एप्रिल रोजी इमरान हाश्मीचा ग्राउंड झिरो देखील पडद्यावर येणार आहे. अजय देवगणचा रेड २ आणि संजय दत्तचा द भूतनी हे चित्रपटही १ मे रोजी प्रदर्शित होणार आहेत. अशा परिस्थितीत केसरी २ बॉक्स ऑफिसवरुन गाशा गुंडाळणार, हे निश्चित आहे. याआधीही अक्षय कुमारचे अनेक मोठ्या बजेटचे चित्रपट बॉक्स ऑफिसवर फ्लॉप ठरले आहेत.

# प्रधानमंत्री सुर्यघर योजनेतून जिल्ह्यात १७ मेगावॅट वीज निर्मिती

## मागेल त्याला सौर कृषीपंप योजना ठरत आहे जिल्ह्यासाठी वरदान

**दैनिक आपला विदर्भ**

**बुलडाणा/प्रतिनिधी :** महावितरणच्या वतीने राबविण्यात येत असलेली प्रधानमंत्री सुर्यघर योजना आणि मुख्यमंत्री सौर कृषीपंप योजना जिल्ह्यासाठी वरदान ठरत आहे. प्रधानमंत्री सुर्यघर योजनेत सहभाग घेणाऱ्यांना ७८ हजार रूपयापर्यंत आणि मागेल त्याला सौर कृषीपंप योजनेसाठी ९५% पर्यंत अनुदान आहे.त्यामुळे या दोन्ही योजनांचा जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी व नागरीकांनी लाभ घेण्याचे आवाहन जिल्हाधिकारी डॉ.किरण पाटील यांनी केले आहे.



जिल्ह्यात महावितरणकडून राबविण्यात येत असलेल्या प्रधानमंत्री सुर्यघर मोफत योजनेत जिल्ह्यातील ४ हजार ९२२ वीज ग्राहकांनी आपल्या घराच्या छतावर सौर प्रकल्प बसवून वीज निर्मितीला सुरूवात केली आहे. त्यामुळे या ग्राहकांचे वीजबिल शुन्यापर्यंत कमी झाले असुन जिल्ह्यात या योजनेच्या माध्यमातून १७.४९ मेगावॅट पर्यावरण पुरक हरित ऊर्जा निर्मिती होत आहे.

प्रधानमंत्री सुर्यघर योजनेत सहभाग घेतल्यास प्रति किलोवॅट ३० हजार रूपयाप्रमाणे प्रथम दोन किलोवॅटकरीता ६० हजार आणि तीसऱ्या किलोवॅटसाठी १८ हजार अश्याप्रकारे जास्तीत जास्त ७८ हजार रूपयाचे शासनाकडून अनुदान देण्यात येते. वीज ग्राहकाने वीजनिर्मिती करून स्वत: वापर करावा आणि शिलकीची वीज महावितरणला विकता येण्याची सोय देखील या योजनेत करण्यात आलेली आहे.

### मागेल त्याला सौर कृषीपंप योजना

मागेल त्याला सौर कृषीपंप योजना जिल्ह्यातील शेतकऱ्यांचे दिवसा विजेचे स्वप्न पूर्ण करत असुन योजनेचा लाभ घेणाऱ्या अनुसूचित जाती व जमाती वर्गवारीतील शेतकऱ्यांना ९५% आणि इतर ग्राहकांना ९० अनुदान देण्यात येते. या योजनेत सहभाग घेण्यासाठी जिल्ह्यात २९ हजार ४८ शेतकऱ्यांनी अर्ज आले आहे. ८ हजार ८१८ शेतकऱ्यांनी आपल्या हिश्याची रक्कमही भरली आहे. ३ हजार ५५६ शेतकऱ्यांनी एजन्सीची निवड केली असून या योजनेत आतापर्यंत ५०० शेतकऱ्यांचा शेतात सौर कृषीपंप बसविण्यात आले आहे.त्याचबरोबर जिल्ह्यात पी.एम.कुसूम योजनेच्या माध्यमातूनही ७ हजार १५० शेतकऱ्यांच्या शेतात सौर कृषीपंप बसविण्यात आले आहे.



DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

# काम न करणाऱ्यांसाठी आता आम्ही निर्णय घेतले

## उपमुख्यमंत्री अजित पवार यांची माध्यमांशी माहिती

दैनिक आपला विदर्भ

**पुणे/प्रतिनिधी :** अनेक खासदार, अनेक आमदार लोकप्रतिनिधींनी विधायक सूचना केलेल्या आहेत. एकंदरीत कामाचा दर्जा चांगला होण्याकरिता, महत्वाचे प्रश्न हे ज्या त्या अधिकायांनी त्यांच्यावर टाकलेली जबाबदारी व्यवस्थितपणे पाडण्याच्या करिता जे निर्णय घ्यायचे होते. ते निर्णय आम्ही सगळ्यांनी मिळून जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करत असलेल्या सर्व तेरा तालुक्यातल्या आणि माझ्या दोन्ही शहरातल्या २१ ते २१ आमदारांनी भाग घेऊन घेतले आहेत.अशी माहिती उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी माध्यमांशी बोलताना दिली.

यावेळी ते म्हणाले की, बराच वेळ अतिशय चांगल्या प्रकारची प्रेझेंटेशन पण झाली. तसेच जी काही कामे डीपीसी मार्फत होतात. त्याचा दर्जा चांगला राहण्यासाठी आपण मीटिंग घेतली. सगळी काम आपल्याला डिसेंबर पर्यंत पूर्ण करायची आहे. जेणेकरून नंतरच्या काळामध्ये एखादी एजन्सी लावून आपण त्या कामाला पैसा दिले ते काम तसेच संपूर्ण पैसा तिथे व्यवस्थितपणे खर्च झालाय का? या सगळ्या गोष्टींचे आम्ही नियोजन केलेले आहे.आम्हाला एक अनुभव वाईट आला की, काम घेतात. मात्र, काम करत नाहीत. त्याही बद्दल काही वेगळे निर्णय आम्ही घेतलेले आहेत. जो व्यक्ती जेवढे बिलोनी गेलाय तेवढी रक्कम त्या ठिकाणी डिपॉझिट म्हणून भरायची तरच, त्याला तिथे टेंडर द्यायचे, याच्यामध्ये वेगवेगळ्या सुचना केलेल्या आहेत. स्वत: मुख्यमंत्र्यांनी एक बैठक घेतली होती.

कॅबिनेटमध्ये सुद्धा चर्चा झाली. त्याच्यामध्ये जे काही तलाव आहे, पाणी साठे आहेत. त्याच्यातील गाळ काढण्याचा पण निर्णय झाला आहे. त्याला कुठल्याही पद्धतीची रॉयल्टी लावायची नाही, तो काय आमच्या शेतकयांनी घेऊन जावा, आपल्या शेतामध्ये वापरावा आणि हा काढलेला गाळ अशा ठिकाणी टाकावा की, पाऊस पडल्यानंतर तो गाळ पुन्हा तलावामध्ये येऊ नये, एवढीच अपेक्षा आम्ही त्या ठिकाणी केलेली आहे. मीटिंगमध्ये मी काय केले? हे सांगायला मी तुम्हाला



बांधील नाही, असा मतही यावेळी त्यांनी व्यक्त केले. आमचा एकंदरीत राज्य सरकारचा पहिला योग्य पद्धतीने खर्च होण्याकरिता जी काही खबरदारी आम्ही लोकांनी घेतली पाहिजे आणि त्याला अधिकायांनीही तसा प्रतिसाद दिला पाहिजे. सगळ्यांनी सहकार्य केले पाहिजे,ते करण्याच्या बद्दलच्या सुचना आम्ही अधिकाऱ्यांना दिल्या. अशी माहिती उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी माध्यमांशी बोलताना दिली.

## संक्षिप्त...

### पहेलगाम येथे झालेल्या भ्याड हल्ल्याचा राष्ट्रवादी शरद पवार गटातर्फे वाशीमध्ये निषेध



दैनिक आपला विदर्भ

**नवी मुंबई/प्रतिनिधी :** जम्मू काश्मीर मधील पहेलगाम या ठिकाणी पर्यटकांवर झालेल्या भ्याड अतिरेकी हल्ल्याचा नवी मुंबई राष्ट्रवादी शरद पवार गटातर्फे निषेध व्यक्त करण्यात आला आहे. वाशी येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकात कार्यकर्त्यांकडून हातावर काळ्या फिती बांधून या भ्याड आतंकवादी हल्ल्याचा निषेध व्यक्त करण्यात आला. यावेळी पाकिस्तान विरोधात जोरदार घोषणाबाजी करत, या हल्ल्यात मृत्यू झालेल्या नागरिकांना श्रद्धांजली व्यक्त करण्यात आली. यावेळी शरद पवार गटाचे नवी मुंबई जिल्हाध्यक्ष चंद्रकांत पाटील यांनी म्हटल की, पहेलगाम येथील दहशतवादी हल्ल्यात जे लोक मृत्युमुखी पडले, त्यांना आम्ही श्रद्धांजली अर्पण केली असून, त्यांच्या कुटुंबियांच्या दुःखात सहभागी आहोत. हा जो हल्ला झाला, तो आपल्या सुरक्षेवर आपल्या शांततेवर झालेला हल्ला आहे.

### नरेश म्हस्के हे अपघाताने झालेले खासदार, दीपेश म्हात्रे यांची माध्यमांशी बोलताना खासदार यांच्यावर टिका



दैनिक आपला विदर्भ

**डोंबिवली/प्रतिनिधी :** काश्मिरमध्ये झालेल्या हल्ल्याच्या घटनेचा इव्हेंट करू नये,असे टिका दीपेश म्हात्रे यांनी खासदार नरेश म्हस्के यांच्यावर माध्यमांशी बोलताना केली. यावेळी ते म्हणाले की, राज्य सरकारमध्ये एक चुरस सुरू आहे की, कोण या लोकांना पहिले मदत करते, मला हे दुर्दैवी वाटते, ज्या परिवारांवर हे संकट ओढवले आहे. त्याकडे आपण लक्ष दिले पाहिजे, त्या परिवारांना मदत कशी होईल हे पाहिले पाहिजे, त्यांच्या पाठिशी खंबीरपणे कसे उभे राहता येईल. याकडे लक्ष दिले पाहिजे. काही लोकांना झोपता, उठता, बसता राजकारणच दिसते, नरेश म्हस्के हे अपघाताने झालेले खासदार आहेत. त्यांना मला एवढेच सांगायचे आहे की, त्यांनी बोलताना भान ठेवून बोलावे,असे मत यावेळी शिवसेना ठाकरे गटाचे गटाचे जिल्हाप्रमुख दीपेश म्हात्रे यांनी व्यक्त केले.

### मनीषा मानेला १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी; डॉ. शिरीष वळसंगकर आत्महत्या प्रकरण



दैनिक आपला विदर्भ

**सोलापूर/प्रतिनिधी :** सोलापुरातील प्रसिद्ध डॉ. शिरीष वळसंगकर आत्महत्या प्रकरणी आरोपी मनीषा मानेला १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आली आहे.प्राप्त माहितीनुसार डॉ. शिरीष वळसंगकर यांना आत्महत्येला प्रवृत्त केल्याप्रकरणी मनीषा मानेवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मनीषा माने हिला आत्तापर्यंत एकूण ५ दिवसांची पोलीस कोठडी दिली होती. त्यानंतर २५ एप्रिल रोजी पोलिसांनी न्यायालयीन कोठडी मिळावी, अशी विनंती कोर्टाला केली आहे.अशी माहिती आरोपीचे वकील प्रशांत नवगिरे यांनी दिली आहे.

### समाजातील विकृतींना आरसा दाखवणारा चित्रपट 'पॉस्को ३०७' चा टिझर रिलीज

मुंबई : प्रोटेक्शन ऑफ चिल्ड्रेन फ ॅाम सेक्स्च्युअल ओफ `न्सेस' म्हणजे पोक्सो कायदा हा बाल लैंगिक अत्याचाऱ्यांना लगाम घालण्यासाठी बनवलेला कायदा आहे. लैंगिक गुन्ह्यांपासून बालकांचं संरक्षण करण्यासाठी आणि अशा घटनांतील गुन्हेगारांना शिक्षा देण्यासाठी भारत सरकारनं २०१२ साली तयार केलेला कायदा आहे. या कायद्याबद्दल जनजागृती करण्यासाठी एक सिनेमा येऊ घातलाय ज्याचं नाव आहे 'पॉस्को ३०७'. समाजातील विकृतींना आरसा दाखवणारा, दिग्दर्शक स्वरूप सावंत यांचा 'पॉस्को ३०७' हा चित्रपट संवेदनशील आहेच परंतु जबरदस्त परिणामकारक देखील असेल.

## पहलगाम दहशतवादी हल्ल्यात मृत्यू झालेल्यांना श्रद्धांजली अर्पण; भ्याड दहशतवादी हल्ल्याचा निषेध




**उमरखेड/प्रतिनिधी :** २२ एप्रिल ला जम्मू कश्मीर येथील पहलगामच्या सुंदर खोऱ्यात काल निष्पाप पर्यटकांवर झालेल्या दहशतवादी हल्ल्यामुळे संपूर्ण देश हादरला आहे. या भ्याड आणि क्रूर कृत्यामुळे निष्पाप लोकांची जीवितहानी झाली. या क्रूर हल्ल्यामुळे, अनेक कुटुंबे कधीही न संपणाऱ्या दुःखाचे आणि दुःखाचे बळी ठरली.या पार्श्वभूमीवर ढाणकी येथे शिवसेना (उ. बा. ठा )व भारतीय जनता तसेच ढाणकी नागरिकांनी दिनांक २४ एप्रिल रोजी छत्रपती शिवाजी महाराज चौक ढाणकी येथे येऊन पाकिस्तानी दहशतवादी यांचा प्रतीकात्मक पुतळा जाळून सरकारला यांना कठोर शिक्षा करण्याची मागणी करत या भ्याड हल्ल्याचा निषेध करण्यात आला व पहलगाम दहशतवादी हल्ल्यातील मृतांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली .

## काश्मीर भेटीवरून विरोधकांच्या टीकेला मंत्री गुलाबराव पाटलांचे सडेतोड प्रत्युत्तर



**जळगाव /प्रतिनिधी :** कश्मीर हल्ल्यानंतर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि मंत्री गिरीश महाजन हे जम्मू काश्मिर येथे गेले होते. त्यांनतर विरोधकांनी त्यांच्यावर टिका केली होती. या टिकेला मंत्री गुलाबराव पाटलांनी प्रत्युत्तर दिले आहे. जनतेच्या हितासाठी विमानाचा वापर केला जातो, सरकार म्हणून लोकांना मदत करणे हे कर्तव्य आहे, यात श्रेय घेण्याचा कोणताही विषय नाही, त्यामुळे विरोधकांना टिका करण्याचा काहीही अधिकार नाही अशा शब्दात जोरदार टिका केली आहे.

## भूमि अभिलेख विभागामार्फत मंगळवारी शिबिराचे आयोजन

### एकत्रीकरण योजनेंतर्गत शेतजमिनीचे अभिलेख नोंदी दुरुस्त करण्याची संधी

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी :** भूमि अभिलेख विभागाकडुन मुंबईचा धारण जमिनीचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध व त्यांचे एकत्रीकरण अधिनियम १९४७ अन्वये एकत्रीकरण योजना राबविण्यात येत आहे. ही योजना राबविताना धारकांची नावे, त्यांचे क्षेत्र व गट क्रमांक नमुद करताना चुका झालेल्या आहेत. या चुका दुरुस्त करण्यासाठी दि. २९ एप्रिल रोजी सकाळी ११ वाजेपासुन उप अधीक्षक भूमि अभिलेख, बुलढाणा शिबीरांचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिराचा शेतकऱ्यांनी उपस्थित राहून लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा अशिक्षक भूमी अभिलेख नरेंद्र झांबरे यांनी केले आहे.

मुंबईचा धारण जमिनीचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध व त्यांचे एकत्रीकरण अधिनियम १९४७ अन्वये हक्क नोंदणीवरील नोंदी, फेरफार व इतर अभिलेखांचे आधारे पुर्वीचे सर्व्हे नंबरचे पोटहिस्यांना गट क्रमांक देणेत येऊन गट नकाशा कायम करण्यात आलेले आहे. सदर योजना राबविताना धारकांची नावे, त्यांचे क्षेत्र, व गट क्रमांक हे नमुद करताना चुका झालेल्या आहेत. याबाबत नागरिकांना पुरेसे ज्ञान नसल्याने किंवा त्यांनी अभिलेखाची पडताळणी न केल्याने, मोजणी न केल्याने अश्या चुका आजरोजीही कायमच आढळुन येत आहेत. तसेच लक्षात येऊनही पुरेशा मार्गदर्शना अभावी चुका दुरुस्तीसंबंधी अर्जदार हे कार्यवाही करताना दिसुन येत नाही. भूमि अभिलेख विभागामार्फत १०० दिवसांचा कृती आराखडा कार्यक्रमांअंतर्गत अश्या लोकांसाठी दि. २९ एप्रिल २०२५ रोजी सकाळी ११ वाजेपासुन उप अधीक्षक भूमि अभिलेख, प्रशासकीय ईमारत, २ रा मजला, बस स्टँडसमोर बुलढाणा येथे मार्गदर्शनपर शिबीर घेण्यात येणार आहे. सदर दिवशी जमिनीचे ७/१२, गट नकाशा, मोजणी नकाशा (तफावत असल्यास), ९ (३) ९(४), हक्कनोंदणी अभिलेख इत्यादी उपलब्ध अभिलेखासह हजर राहून मार्गदर्शन शिबीराचा लाभ घ्यावा.

## पहेलगामचा हल्ला कोणा व्यक्तीवर नाही देशावरचा हल्ला

### उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची प्रतिक्रिया

दैनिक आपला विदर्भ

**सिंधुदुर्ग /प्रतिनिधी :** पहलगाव मध्ये झालेल्या भ्याड हल्ल्यावेळी सर्व पर्यटक हे भयभीत झाले होते. ते महाराष्टमधील जे लोक होते ते फोन करत होते. त्यामुळे मी तिथे गेलो होतो. भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. पहेलगामचा हल्ला कोण्या व्यक्तीवर नाही, तर, तो देशावरचा हल्ला आहे. असे मत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी माध्यमांशी बोलताना व्यक्त केले.

यावेळी ते पुढे म्हणाले की, पहेलगाव येथे झालेल्या दहशतवादी हल्यानंतर महाराष्ट्रातून चार विशेष विमानांची व्यवस्था त्यांना आणण्यासाठी केली होती. त्या सगळ्या ग्रुपला महाराष्ट्रामध्ये आणण्याचे काम आम्ही के ले. त्यामुळे त्यांना आधार वाटला, अशा लोकांना मॉरल सपोर्ट देणे ही आमची जबाबदारी आहे. बाळासाहेबांची शिकवण आहे. आनंद दिघे यांची शिकवण आहे. आपत्ती व आपदा संकट जेव्हा जेव्हा येते मग केरळ असेल, इरशाळवाडी असू देत कोल्हापुरातला पूर, अगदी उत्तराखंड त्या ठिकाणी मी गेलो. सर्वपक्षीय बैठकीत ठाकरे गटाची गैरहजेरी हेच ते राष्ट्रप्रेम आहे? असा उपरोधिक प्रश्न यावेळी त्यांनी केला.



बाळासाहेबांचे नकली आवाज काढणाया लोकांकडून काय अपेक्षा ठेवणार? असा उपरोधिक प्रश्नही यावेळी त्यांनी उपस्थित केला. पहेलगामचा हल्ला कोण्या एका व्यक्तीवर नाही. देशावरचा हल्ला आहे. पाकिस्तानला चोक आणि जशास तसे उत्तर देण्याचे व खून का बदला खून से देण्याचा निश्चय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केला आहे. विचारांच्या पलीकडे जाऊन पाकिस्तानला धडा शिकवला जाईल, पाकिस्तानचे नामोनिशान मिटवण्याचे काम देशाचे पंतप्रधान आणि गृहमंत्री करतील. असे मत यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी माध्यमांशी बोलताना व्यक्त केले.

## पहलगाम हल्ला प्रकरणी राजकारण होता कामा नये

### शरद पवार यांनी पत्रकार परिषदेत व्यक्त केले मत

दैनिक आपला विदर्भ

**सिंधुदुर्ग /प्रतिनिधी :** काश्मिरमध्ये जे झाले. त्या प्रश्नाकडे सगळ्या देशवासीयांनी एका विचाराने सरकारसोबत राहिले पाहिजे,इथं राजकारण होता कामा नाही,अतिरेक्यांनी जी ॲक्शन घेतली, ती भारताच्या विरोधी घेतली आहे. देशाच्या विरुद्ध असे कोणी निर्णय घेते तिथे राजकारण करायचे नसते. असे मत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष खासदार शरदचंद्र पवार यांनी माध्यमांशी बोलताना व्यक्त केले. यावेळी ते म्हणाले की, त्या दृष्टीने आम्ही लक्ष घातले. सरकारने सर्वपक्षीय बैठक बोलावली. त्यामध्ये आमच्या पक्षाच्या वतीने सुप्रिया सुळे उपस्थित होत्या. पण सरकारने हे अधिक गांभीर्याने घ्यायला पाहिजे,गेले काही दिवस सरकारच्या वतीने सतत सांगितले जात होते की, आम्ही मोडून काढले. दहशतवाद आम्ही संपवला. आता काय चिंता नाही. असे होत असेल तर, आनंद आहे.घडलेली घटना बघितल्यानंतर कुठे ना कुठे कमतरता आहे हे स्पष्ट दिसून येत आहे.ही कमतरता सरकारने घालवायला हवी. सरकारने अधिक गांभीर्याने घ्यावे, सरकार कमतरता आहे हे मान्य करत असेल त्यांनी तातडीने पावले टाकावीत. काही कामात आम्हा लोकांचें सहकार्य राहील. पहलगाम हे त्यातल्या त्यात अधिक सुरक्षित आहे. दोन-तीन महिन्यापूर्वीच मी जाऊन आलो. सातत्याने आपले लोक तिथे जातात. दहशतवाद्यांनी आपले उद्दिष्ट साध्य केले. आपण काळजी घ्यायला पाहिजे, हिंदू आहेत म्हणून गोळ्या घातल्या. यामध्ये काय सत्य आहे याबाबत मला माहिती नाही.



पण तिथे जी लोक होती, त्यातील स्त्रियांना सोडले असे दिसतंय.मी एका भगिनीच्या घरी गेलो होतो. त्यावेळी त्यांनी सांगितले की, आम्हा महिलांना हात लावला नाही. त्यांनी फक्त आमच्या पुरुषांना हात लावला.अशी माहितीही शरदचंद्र पवार यांनी दिली. तसेच म्हणाले की, कलम ३७० आम्ही संपविले असे सरकार म्हणतंय. पण तिथल्या लोकांची काश्मिरी जनतेची मते वेगळी आहेत.लव्ह जिहाद या प्रकाराला सध्याचे सरकार अशा गोष्टींना प्रोत्साहन देत आहे. त्यामुळे अशा घटना वाढत आहेत.काही प्रवृत्ती समाजात निर्माण होत आहेत. ज्यावेळी देशात असे वातावरण होते त्यावेळी सीमेमध्ये असे काही घडते. त्यामुळे सरकारने अधिक गांभीर्याने घेतले पाहिजे.

त्यामुळे सरकारने संभ्रम आणि कटुता कमी होईल,यासाठी काळजी घ्यायला पाहिजे. आज प्रश्न निर्माण होत आहे की, ज्यांनी हल्ले केले. त्यांना शोधायला हवे,मी आज कोणाला काढा, कोणाला सोडा, या बद्दल मी आज बोलणार नाही.लढाई धर्माच्या विरोधात आहे.अतिरेक्यांनी यापूर्वी देखील ॲक्शन घेतली आहे. तीन-चार घटना घडल्या आहेत. तेव्हा धर्माची चर्चा झाली नव्हती. आज धर्माची चर्चा का सुरू आहे? घडले ते वाईट आहे.लोक काही दिवस काश्मीरला जाणार नाहीत असेच दिसते. त्यामुळे काश्मीरच्या जनतेचे मोठे नुकसान होईल. पण एक जमेची बाजू घडली आहे, ज्यामध्ये लोक रस्त्यावर उतरले आणि ते भारताच्या बाजुने उभे राहिले. आज आपण असे निर्णय घेतो. उद्या पाकिस्तान सुद्धा अशाप्रकारचे निर्णय घेईल. त्यांचे विमान आमच्या हद्दीत येणार नाही, असं जर तुम्ही ठरवले तर, आपली विमाने देखील त्यांच्या हद्दीत जाणार नाहीत. असे ते ठरवतील युरोप कंट्रीला जाणारी सर्व विमान पाकिस्तान मार्गे जातात. जर पाकिस्तान मार्गे विमान गेली नाहीत. तर, विमान प्रवास अधिक महाग होईल. आपण काही निर्णय असे घेतले तर पाकिस्तान गप्प बसेल असे वाटत नाही.असे मतही माध्यमांशी बोलताना राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष शरदचंद्र पवार यांनी व्यक्त केले.

## विविध वृत्त...

### उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा जिल्हा दौरा

**दैनिक आपला विदर्भ**

**बुलडाणा/प्रतिनिधी :** राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे रविवार, दिनांक २७ एप्रिल २०२५ रोजी बुलडाणा जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत आहे.



त्यांचा दौरा कार्यक्रम पुढीलप्रमाणे आहे : रविवार दिनांक २७ एप्रिल रोजी सकाळी १०.३० वाजता छत्रपती संभाजीनगर येथून म. राज्य परिवहन महामंडळ कार्यशाळेच्या मागे, कऱ्हाळे ले आऊट, जि. बुलढाणा येथे आगमन व मोटारीने कार्यक्रमस्थळाकडे प्रयाण. सकाळी ११ वाजता टिळक नाट्य क्रीडा मंदिर, बुलढाणा येथे जाहिर आभार सभा. दुपारी २ वाजता मोटारीने कऱ्हाळे ले आऊट हेलिपॅडकडे प्रयाण. दुपारी २.४५ वाजता आगमन व हेलिकॉप्टरने छत्रपती संभाजीनगर विमानतळाकडे प्रस्थान करतील.

### समता परिषदेच्या तालुका प्रवक्तपदी श्रीकृष्ण जुमडे यांची निवड

**दैनिक आपला विदर्भ**

**मेहकर/प्रतिनिधी :** अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेच्या मेहकर तालुका प्रवक्तेपदी मेहकर तालुक्यातील अंजनी बु.येथील श्रीकृष्ण तुकाराम जुमडे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. संदिप बबनराव पांडव अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषद मेहकर तालुका अध्यक्ष तथा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी बुलडाणा जिल्हासचिव संदीप बबनराव पांडव यांनी तालुक्यातील अंजनी बुद्रुक येथील श्रीकृष्ण जुमडे यांची आखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेच्या मेहकर तालुका प्रवक्तेपदी नियुक्ती केली आहे. नियुक्तीच्या प्रतिलिपी अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेचे संतोष खांदेभरड यांना दिली आहे. नियुक्ती संदर्भात प्रतिक्रिया व्यक्त करताना नवनिर्वाचित प्रवक्ते श्रीकृष्ण जुमडे यांनी आपल्यावर टाकलेल्या जबाबदारीला तडा न जाऊ देता दिलेली जबाबदारी विश्वासाने पूर्ण करून महात्मा फुले समता परिषदेचे प्रस्थ वाढवण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे मत व्यक्त केले.तसेच आपल्या पदाच्या माध्यमातून गोरगरीब जनतेला न्याय देऊन टाकलेला विश्वास सार्थकी लावला जाईल,अशी ग्वाही यावेळी जुमडे यांनी दिली.

### केस व नखं गळती भागाचा दौरा आटोपून केंद्राच आकस्मित चिकित्सा राहत पथक रवाना

**दैनिक आपला विदर्भ**

**बुलडाणा/प्रतिनिधी :** बुलढाणा जिल्ह्यातील शेगाव तालुक्यातील गावात गेल्या अनेक दिवसांपासून नागरिकांना केस गळती व नंतर नखं गळतीचा त्रास सुरू झाला होता. केंद्र सरकारने या भागाचा दौरा करण्यासाठी आकस्मित चिकित्सा राहत पथक स्थापन करून या भागाचा दौरा करण्याचे आदेश दिले होते. यानुसार या पथकाने तीन दिवस शेगाव तालुक्यातील अनेक गावांचा दौरा करून केस गळती व नख गळती होत असलेल्या रुग्णांची पाहणी केली व त्यांच्याशी संवाद साधला. या पथकाने बुलढाणा येथील अन्न व औषध प्रशासन विभागाच्या कार्यालयात भेट दिली आहे व तिथून ते दिल्लीसाठी रवाना झाला आहे.

### दहशतवादी हल्ल्याच्या निषेधार्थ यवतमाळ मध्ये मुस्लिम बांधवांनी बांधल्या हाताला काळी पट्टी

**दैनिक आपला विदर्भ**

**यवतमाळ/प्रतिनिधी :** जम्मू-काश्मीरच्या पहलगाममध्ये झालेल्या दहशतवादी हल्ल्याच्या निषेधार्थ यवतमाळ मध्ये मुस्लिम बांधवांनी शुक्रवारच्या नमाज पठणावेळी हाताला काळी पट्टी बांधली. या हल्ल्यानंतर देशभरात संतापाची लाट आहे. पाकिस्तानला धडा शिकवण्याची मागणी जोर धरु लागली आहे. निष्पाप पर्यटकांना दहशतवादी हल्ल्यात जीव गमवावा लागला. त्यांच्या कुटुंबियांचा आक्रोश हृदय पिळवटून टाकणारा आहे. या सगळ्या पार्श्वभूमीवर मुस्लिम बांधवांनी मस्जिदी मध्ये दंडाला काळी पट्टी बांधून नमाज पठण केले व शोक व्यक्त केला. दहशतवादाविरोधात एकजुटीचा हा संदेश असल्याचे मुस्लिम बांधवांनी सांगितलं.



# जीवे मारण्याच्या धमक्या आम्हालाही येतात : आ. संजय गायकवाड

**दैनिक आपला विदर्भ**

**बुलडाणा/प्रतिनिधी :** अर्जुन खोतकर यांना जीवे मारण्याची धमकी दिली आहे. आम्हालाही धमक्या येतात.चांगले काम करतात तर धमक्या येणारच आहेत. अशी मत आमदार संजय गायकवाड यांनी पत्रकार परिषदेत व्यक्त केले.



ते म्हणाले की, माझ्या मुलालाही धमकीचे पत्र आलेले आहे. माझ्या मुलांपर्यंत पोचण्याच्या आधी त्यांना पहाडाचा सामना करावा लागणार आहे. पोलिसवाले काहीच करू शकत नाही. पोलिस सारखे अकार्यक्षम डिपार्टमेंट भारतात काय जगात कुठेच नसेल. पोलिस डिपार्टमेंट म्हणजे शासनाने कोणताही कायदा काढला की, यांचा एक हप्ता वाढला. राज्यातल्या देशातल्या पोलिसांनी इमानदारीने काम जर केले. तर, सगळ्या गंदगी खातम होऊ शकते. इमानदारीने काम केले. तर, सगळी गुन्हेगारी खातम होऊ शकते. तुम्ही बातमी पाहिली असेल एक पोलिसाला चोरांचा मास्तर निघाला. बुलढाण्यात दोन-दोन पोलिस कॉन्स्टेबल असे होते की, त्यांची चोरासोबत पार्टनरशिप होती. पोलिसांनी एखाद्या ठिकाणी रेड केली आणि ५० लाख पकडले तर ५० हजारच दाखवतात. एक वर्षभर यांनी जर इमानदारीने काम केले. तर, सगळे सुतासारखे सरळ होईल. पहलगाम संदर्भात अद्याप कारवाई होत नाही, काँग्रेस आणि आताचे सरकारमध्ये फरक आहे का? असा प्रश्न उपस्थित केला असता,काँग्रेस आणि भाजपा सरकार मध्ये प्रचंड फरक आहे, असे मत आमदार गायकवाड यांनी व्यक्त केले. मोदींकडून भरपूर अपेक्षा आहेत. पण इस्रायलच्या अध्यक्षांनी ज्या पद्धतीने एक्शन घेतली,त्या पद्धतीने आपल्याकडे काम करताना दिसत नाहीत. जसे जखमेचे रक्त पडते आणि रोज ड्रेसिंग होते. तसे पाकिस्तान आणि बांगलादेशचे झाले आहे.त्यामुळे याला कायमचे ड्रेसिंग झाले पाहिजे, त्याशिवाय हे थांबू शकत नाही. एकनाथ शिंदे यांचा आभार दौरा कशासाठी ? असा प्रश्न केला असता एकनाथ शिंदे यांनी लाडक्या बहिणीला १५०० , २००० , २५०० आणि ३००० देणार. पण टप्प्याटप्प्याने देणार सांगितले होते. शेतकरी कर्जमाफी देऊ, आल्यावर देऊ किंवा दोन चार महिन्यात देऊ, असे कोणीच म्हंटले नाही,असे स्पष्टीकरणही यावेळी गायकवाड यांनी दिले. पाकिस्तानने आदळआपट सुरू केली. मला पंतप्रधान यांना मेसेज द्यायचा आहे की, निर्णय घ्यायचा असेल तर इस्रायलचे प्रधानमंत्री यांच्या सारखा घ्यायला पाहिजे, त्यांनी घरात घुसून मारले तर, आजपर्यंत बदला घ्यायचा कार्यक्रम चालू आहे. पाकिस्तानने आपले एवढे लोक मारले आणि आपण पाणी बंद करायचा निर्णय घेतो, त्या पाकिस्तानाला चिरडून टाकायला पाहिजे, यांच्यामुळे देश असुरक्षित झाला आहे.

२६ जानेवारीचा झंडा लावायचा म्हटले तर, भीती राहते. आपले कोणतेही मंदिर सुरक्षित नाही. आतंकवाद्यांमुळे सुरक्षाव्यवस्थेत भारताचा अर्धा खर्च त्यात जातो. बॉंडरी लाइन नसल्याने आतंकवादी भारतात घुसतात.भारतात राहणाया सर्व लोकांना सगळ्या भाषेचे नॉलेज असले पाहिजे, आपण बाहेर राज्यात जातो तर, तिकडच्या भाषा आम्हाला कळत नाहीत. त्यामुळे हिंदी, इंग्रजी सोबत उर्दू भाषा देखील समजली पाहिजे, संभाजी महाराजांना १६ भाषा यायच्या. त्यांनी त्याचा अभ्यास का केला? त्यांना जगात लढायचे आहे, म्हणून सगळ्या भाषा आल्या पाहिजेत. शिवाजी महाराजांना सगळ्या भाषा यायच्या. उर्दू भाषा का आली पाहिजे तर, आतंकवाद्यानचे मेसेज येतात. तर, ते आपल्या लोकांना वाचता येत नाही.भारतात पाकिस्तानी नागरिक आहेत.भारतात पाकिस्तानी आणि बांगलादेशी पण आहेत.बांगलादेशची सीमा आम्ही मोकाट सोडून दिलीय. बाळासाहेब १९८३ मध्ये सांगायचे की, दोन कोटी बांगलादेशी भारतात घुसले. आता ते किती कोटी असतील, सांगता येत नाही. का बॉर्डर बंद करत नाहीत असा प्रश्न निर्माण होत आहे.संजय राऊत मेल्याशिवाय शांती भेटणार नाही. ते मरेपर्यंत अशीच बडबड करणार आहेत. उद्धव आणि राज एकत्र येणार त्यांच्या पक्षाची ताकद आणि शक्ती किती वाढेल, हे तुम्ही आम्हाला सांगा असा उपरोधिक प्रश्न यावेळी आमदार संजय गायकवाड यांनी यावेळी केला.

# शेतकऱ्यांनो फार्मर आयडी बनवला नसेल तर लगेच बनवून घ्या !

## कृषी योजनांच्या लाभासाठी फार्मर आयडी अनिवार्य

**दैनिक आपला विदर्भ**

**बुलडाणा/प्रतिनिधी :** केंद्र व राज्य शासनाच्या कृषी योजनांचा लाभ शेतकऱ्यांपर्यंत जलद गतीने पोहोचविण्यासाठी शेतकऱ्यांचे शेतकरी ओळख क्रमांक अर्थात फार्मर आयडी १५ एप्रिलपासून अनिवार्य करण्यात आले आहे. जिल्ह्यात ५ लक्ष ७२ हजार १२८ खातेदार असून त्यापैकी ३ लक्ष ५० हजार ३०७ शेतकऱ्यांनी (६१.२३ टक्के) नोंदणी केली आहेत. त्यामुळे ज्या शेतकऱ्यांनी फार्मर आयडी बनवून घेतले नाही त्यांनी आपल्या जवळच्या सीएससी केंद्रावर नोंदणी करुन शेतकरी ओळख क्रमांक अर्थात फार्मर आयडी बनवून कृषी योजनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी केले आहे.




जिल्ह्यात एकूण खातेदारांपैकी ४ लक्ष ३४ हजार ४६८ प्रधानमंत्री किसान सन्मान योजनेतील लाभार्थी आहेत. त्यापैकी २ लक्ष ७३ हजार २३४ खातेदारांनी शेतकरी ओळखपत्र क्रमांक काढले असून त्याची टक्केवारी ६२.८९ इतकी आहे. विविध शासकीय योजनांचा लाभ घेण्यासाठी जसे कि, प्रधानमंत्री किसान सन्मान योजना, नमो शेतकरी सन्मान योजना, प्रधानमंत्री पिक विमा योजना, नानाजी देशमुख कृषि संजीवनी, महाडीबीटी, मदत व पुनर्वसन विभागामार्फत नैसर्गिक आपत्ती करिता देण्यात येणारी मदत याकरिता दि. १५ एप्रिल, २०२५ च्या शासन निर्णयानुसार अनिवार्य करण्यात आले आहे. अद्याप जिल्ह्यात २ लक्ष २१ हजार ८२१ शेतकऱ्यांनी शेतकरी ओळखपत्र क्रमांक बनवून घेतलेले नाहीत. असे शेतकरी शासकीय योजनेच्या लाभापासून वंचित राहण्याची शक्यता आहे. त्यांनी आपल्या ग्राम महसूल अधिकारी, ग्रामविकास अधिकारी व कृषि सहाय्यक यांना संपर्क साधून जवळच्या सीएससी केंद्रावर नोंदणी करून शेतकरी ओळख क्रमांक अर्थात फार्मर आयडी बनवून कृषी व ईतर संलग्न विभागामार्फत योजनांचा लाभ घ्यावा. याबाबत शेतकऱ्यांना काही अडचण निर्माण झाल्यास आपल्या तहसील किंवा तालुका कृषि अधिकारी कार्यालयास संपर्क साधावा. आपल्या नजीकचे सी.एस.सी.केंद्र शोधण्यासाठी शेतकऱ्यांनी https://locator.csccloud.in लिंकचा वापर करावा.

जिल्ह्यातील सर्व शेतकऱ्यांना विविध शासकिय योजनांचा लाभ व शासकीय मदत घेण्यासाठी शासन निर्णयानुसार शेतकरी ओळखपत्र क्रमांक अनिवार्य करण्यात आला असून ज्या शेतकऱ्यांनी अद्याप शेतकरी ओळखपत्र क्रमांक काढला नसेल त्यांनी आजच नजीकच्या सी.एस.सी केंद्रावर जावून आपले नावाची नोंदणी करून शेतकरी ओळखपत्र काढून घ्यावे, असे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी केले आहे.

प्रवाश्यांच्या समस्या व निराकरणासाठी प्रत्येक बुधवारी

# "प्रवासी राजा दिन" व "कामगार पालक दिन"

## राज्य मार्ग परिवहन महामंडळाचा उपक्रम



**दैनिक आपला विदर्भ**

**बुलडाणा/प्रतिनिधी :** महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ बुलढाणा विभागाकडून प्रवाशांना भेडसावणाऱ्या दैनंदिन समस्या, तक्रारी व सुचनांचे आगार पातळीवर जलदगतीने निराकरण करण्यासाठी जिल्ह्यातील प्रत्येक आगारात दर महिण्याच्या बुधवारी सकाळी १० ते २ या वेळेत "प्रवासी राजा दिन" व दुपारी ३ ते ५ या वेळेत "कामगार पालक दिन" आयोजित करण्यात येणार आहे. त्याअनुषंगाने मे महिण्यासाठी वेळापत्रक जाहिर करण्यात आले असून प्रवाशी आणि महामंडळाचे कामगारांनी लाभ घेऊन समस्यांचे निराकरण करावे, असे आवाहन परिवहन महामंडळाचे विभाग नियंत्रक यांनी केले आहे.

परिवहन महामंडळाच्या आगारामध्ये सकाळी १० ते दुपारी २ दरम्यान प्रवासी राजा दिन साजरा करण्यात येणार आहे. यावेळेत प्रवासी, प्रवासी संघटना, शाळा-महाविद्यालये त्यांच्या समस्या, तक्रारी, सूचना लेखी स्वरुपात मांडू शकतील. तसेच दुपारी ३ ते सायंकाळी ५ दरम्यान कामगार पालक दिन साजरा करण्यात येणार आहे. संघटना, कर्मचाऱ्यारी वैयक्तिक प्रश्न, तक्रारी लेखी स्वरुपात घेऊन तक्रारीचे किंवा समस्यांचे तात्काळ निराकरण करतील.

बुलडाणा विभागातील चिखली आगार येथे बुधवार दि. ७ मे, खामगाव आगार येथे बुधवार दि. १४ मे, मेहकर आगार येथे बुधवार दि. २१ मे, मलकापुर येथे बुधवार दि. २८ मे, जळगाव जामोद येथे दि. ४ जुन व शेगांव आगार येथे बुधवार दि. ११ जुन रोजी प्रवासी राजा दिन व कामगार पालक दिन कार्यक्रम घेण्यात येणार आहे.

# विकसित भारताचे लक्ष्य साध्य करण्यास कृत्रिम बुद्धिमत्ता प्रमुख घटक - कुलगुरू प्रो. कुमुद शर्मा

**दैनिक आपला विदर्भ**

## वर्धा येथील हिंदी विश्वविद्यालयात कृत्रिम बुद्धिमत्तेचा जबाबदारीने वापर जनसंपर्काची भूमिका विषयावर राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन

**बुलडाणा/प्रतिनिधी :** आपल्याला नवीन तंत्रज्ञानासोबत पुढे जावे लागेल. विकसित भारताचे ध्येय साध्य करण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता ही एक प्रमुख शक्ती ठरेल. आपण कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर जाणीवपूर्वक, सावधगिरीने आणि विवेकाने केला पाहिजे असे प्रतिपादन वर्धा येथील महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विश्वविद्यालयाच्या कुलगुरू प्रो. कुमुद शर्मा यांनी केले.

महाराष्ट्र शासनाच्या माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, नागपूर-अमरावती विभाग, विश्वविद्यालयाचे जनसंचार विभाग व जनसंपर्क कार्यालय आणि पब्लिक रिलेशन्स सोसायटी ऑफ इंडिया, वर्धा चॅप्टर यांच्या संयुक्त विद्यमाने २२ एप्रिल रोजी आयोजित कृत्रिम बुद्धिमत्तेचा जबाबदारीने वापर : जनसंपर्काची भूमिका या विषयावरील राष्ट्रीय चर्चासत्राच्या उद्घाटन समारंभाच्या अध्यक्षस्थानावरून कुलगुरू प्रो. शर्मा उपस्थितांना संबोधित करीत होत्या. यावेळी प्रमुख पाहुणे पीआरएसआय पश्चिमचे उपाध्यक्ष एस.पी. सिंह, अमरावती विभागाचे माहिती उपसंचालक अनिल आलूरकर, मानविकी व सामाजिक विज्ञान विद्यापीठाचे अधिष्ठाता प्रो. फरहद मलिक, जनसंचार विभागाचे अध्यक्ष प्रो. कृपाशंकर चौबे, विश्वविद्यालयाचे कुलसचिव प्रो. आनन्द पाटील मंचावर उपस्थित होते.

दोन दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्राचे उद्घाटन विश्वविद्यालयाच्या गालिब सभागृहात मंगळवारी झाले. या प्रसंगी एस. पी. सिंह म्हणाले की बदलत्या परिस्थितीत कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर जनसंपर्क क्षेत्रात व दैनंदिन कामात केला पाहिजे. त्यांनी कविता आणि शेर शायरीच्या माध्यमातून प्रेक्षकांना कृत्रिम बुद्धिमत्तेचे महत्त्व समजावून सांगितले. अमरावती विभागाचे माहिती उपसंचालक अनिल आलूरकर यांनी कृत्रिम बुद्धिमत्तेचे धोके आणि त्याबाबत सावधगिरी बाळगण्याची गरज स्पष्ट करताना सांगितले की या तंत्रज्ञानाचा वापर देश आणि समाजाच्या कल्याणासाठी झाला पाहिजे. स्वागतपर भाषणात मानविकी व सामाजिक विज्ञान विद्यापीठाचे अधिष्ठाता प्रो. फरहद मलिक म्हणाले की आपण भारतीय ज्ञान परंपरेला कृत्रिम बुद्धिमत्तेशी जोडून देश आणि जगात तिचा प्रसार केला पाहिजे.

विषय प्रवर्तन करतांना जनसंचार विभागाचे अध्यक्ष प्रो. कृपाशंकर चौबे यांनी सांगितले की चॅट जीपीटी द्वारे समस्या कशा सोडवता येतात. कृत्रिम बुद्धिमत्ता आपल्या जीवनावर परिणाम करत आहे आणि मोठे बदल घडवून आणत आहे. विश्वविद्यालयाचे जनसंपर्क अधिकारी बी. एस. मिरगे यांनी पीआरएसआयचा परिचय देतांना सांगितले की, पीआरएसआयचे देशभरात एकूण २५ चॅप्टर कार्यरत आहेत, ज्यामध्ये जनसंपर्क अधिकारी, मीडिया शिक्षक व मीडियाचे विद्यार्थी जोडले गेले आहेत. दरवर्षी २१ एप्रिल हा दिवस राष्ट्रीय जनसंपर्क दिवस म्हणून एका नवीन विषयावर साजरा केला जातो. यावेळी पाहुण्यांचे स्वागत सुतमाळ, शाल आणि सन्मान चिन्ह देऊन करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन व कुलगीताने झाली. कार्यक्रमाचे संचालन




जनसंचार विभागाचे असोसिएट प्रोफ सर डॉ. राजेश लेहकपुरे यांनी केले तर वर्धा जिल्हा माहिती अधिकारी रवी गीते यांनी आभार मानले. यावेळी विदर्भातील जिल्हा माहिती अधिकारी, जनसंपर्क अधिकारी, माहिती अधिकारी, विश्वविद्यालयाचे अधिष्ठाता, विभागप्रमुख, शिक्षक, शोधार्थी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

उद्घाटन सत्रानंतर महादेवी वर्मा सभागृहात शिक्षणाच्या विकासात एआयची उपयोगिता या विषयावर शिक्षण विद्यापीठाचे अधिष्ठाता प्रो. गोपाल कृष्ण ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली शैक्षणिक सत्र पार पडले. यावेळी विश्वविद्यालयाचे लीला प्रभारी डॉ. अंजनी कुमार राय, आयआयआयटी, नागपूरचे सहायक प्रोफेसर डॉ. शिशुपाल कुमार, सॉफ्टवेअर असोसिएट डॉ. हेमलता गोडबोले यांनी आपले विचार व्यक्त केले. सत्राचे संचालन पीआरएसआय वर्धा चॅप्टरचे उपाध्यक्ष प्रफुल्ल दाते यांनी केले तर डॉ. अनवर अहमद सिद्दीकी यांनी आभार मानले.

मीडिया व जनसंपर्क मध्ये ए.आय. ची उपयुक्तता या विषयावरील सत्राचे अध्यक्षस्थान एस पी सिंह यांनी भूषविले. सत्रात विदर्भातून आलेले माहिती अधिकारी यांनी सहभाग घेतला व एआयची जनसंपर्कात भूमिका यावर विचार मांडले.